Vol 5 Issue 1 July 2015 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Dr. T. Manichander

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 3.4052(UIF)
Volume - 5 | Issue - 1 | July - 2015

# दलित साहित्याचे निराळेपण विविध मते

प्रा.चांगदेव कांबळे

## सारांश :

दलित साहित्याचे निराळेपण शोधत असताना त्याच्या काही व्याख्याही विचारात घेणे गरजेचे आहे. जीवनात काही प्रश्न निर्माण होतात. ते तीव्र बनतात. त्यांची आंच किंवा दाहकाता समाजाला प्रकर्षाने जाणवू लागते तेव्हा चळवळ निर्माण होते.
प्रत्यक्ष जीवनात निर्माण होणाऱ्या प्रश्नांच्या अनुषंगाने ज्या चळवळी निर्माण होतात त्यांचा आणि साहित्य चळवळींचा निकटचा संबंध असतो. जीवनात घडून येत असलेला बदल,या बदलाला लाभणारा व्यापक जनाधार,स्वतंत्र अन्वेषणदृष्टी,प्रज्ञावंत उर्जाकेंद्र हे कोणत्याही चळवळीचे प्रमुख घटक असतात. चळवळी जीवनातल्या असोत की साहित्यातल्या,त्या जीवनाची पुर्ण मांडणी करू इच्छित असतात.दलित चळवळीलाही हेच अपेक्षित होते. दलित साहित्याची चळवळ ही दलित चळवळीचेच एक अंग आहे.

## Short Profile

Pro. Changdev Kamble is working as Karmveer Bhaurao Patil Mahavidhyalay, Pandharpur, District-Solapur.

## प्रस्तावना :

१९५६ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्यासह, त्यांच्या प्रेरणेने दलितांनी मोठया प्रमाणात धर्मांतर केले. याचवर्षी म्हणजे ६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निधन झाले. नंतरच्या काळात दलितांवर जे अत्याचार, बहिष्कार, हल्ले झाले, दलित स्त्रियांवर बलात्कार झाले, त्यांना नग्न करून त्यांची धिंड काढण्याचे प्रकार झाले. त्यामुळे दलितांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण होणे स्वाभाविक होते. त्यातूनच दलित चळवळ उदयाला आली.

१९५८ साली मुंबई येथे पहिले दलित साहित्य संमेलन भरले या संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी शाहीर आण्णा भाऊ साठे यांनी “ही पृथ्वी शेषाच्या मस्तकारवर तरली नसून दलितांच्या तळहातावर तरली आहे”[१] असे विधान केले. याच संमेलनात मराठी भाषा व साहित्य क्षेत्रात दलित लेखकांचे व अन्य लेखकांचे दलितांविषयीचे साहित्य यांचा ‘दलित साहित्य’ म्हणून स्वतंत्र विभाग मानण्यात यावा असा ठराव पास करण्यात आला.

दलित शब्दाची व्युत्पत्ती समजून घेण्यासाठी चातुर्वर्ण्य व्यवस्था समजून घ्यावी लागते. या चातुर्वर्ण्य रूपी जात्यात भरडल्या गेलेल्या, चिरडल्या गेलेले, दळले गेलेले किंवा जात असलेले ते सर्व दलित. दळण - दळित - दलित. अशी दलित शब्दाची व्युत्पत्ती सांगता येते. प्रबोधनाचे विविध प्रवाह, फुले आंबेडकरी चळवळी, मार्क्सवादी विचारधारा, स्वातंत्र्योत्तर काळात बहुजन समाजात झालेली जागृती, तिच्यातून त्यांना प्राप्त झालेले आत्मभान इ. मुळे साहित्यिक, विचारवंत यांनी दलित साहित्याची संकल्पना वेगवेगळया स्वरूपात मांडली आहे. ते आपापल्या भूमिकेनुसार ‘दलित’ या शब्दाचा अन्वयार्थ लावताना दिसतात. काहींनी ही व्याख्या चातुर्वर्ण्य व्यवस्थेशी निगडित अशी केली आहे. तर काहीनी या संकल्पनेचा खूपच व्यापक अर्थ विशद केला आहे. असा अर्थ देणाऱ्या विचारवंतानी तळागाळातील सर्व व्यक्ती व त्यांची क्रांती ह्याला स्थान दिले आहे. त्यांनी दलितांमध्ये अर्थिकदृष्ट्याा, मानसिकदृष्ट्याा कुचंबलेल्या अशा सर्वच

कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय , पंढरपूर – जि.सोलापूर.

उच्चवर्णियांचा स्त्रियांसह समावेश केला आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी या संदर्भात आपले विचार मांडले आहेत. ते 'दलित' शब्दाची व्याखा खालीलप्रमाणे करतात, "मानवी प्रगतीत सर्वात मागे राहिलेला, रेटलेला सामाजिक वर्ग म्हणजे दलित. "[२]

डॉ. म.ना. वानखेडे यांनी, "दलित शब्दाची व्याख्या केवळ बौद्ध अथवा मागावसवर्गीय नव्हे, तर जे पिळले गेलेले श्रमजीवी आहेते ते सर्व दलित या व्याख्येत समाविष्ट होतात."[३] असे म्हटले आहे.

बाबुराव बागुल यांनी या संदर्भात म्हटले आहे की, "दलित म्हणजे वर्णव्यवस्थेत आणि तिच्या समग्र विचारव्यवस्थेला उद्ध्वस्त करू बघणरा. युगाने ज्याचे हात प्रज्ञावंत, प्रलयंकारी केलेले आहेत आणि ज्याच्यासाठी आधुनिक शस्त्रे आणि शास्त्रे उपलब्ध करून दिलेली आहेत तो."[४]

याच संदर्भात चर्चा करीत असताना डॉ. सदा कऱ्हाडे यांनी म्हटले आहे की, "आर्थिकदृष्ट्याा व सामाजिकदृष्ट्याा मिळून एक सर्वसमावेशक दलितवर्ग मानता येईल. त्यात कामगार, शेतमजूर, उपजीविकेसाठी श्रमणारे आणि अस्पृश्यही येतील. ज्यांची पिळवणूक होते ते दलित."[५] याठिकाणी असे लक्षात येते की, साम्यवादी विचारसरणीच्या डॉ. सदा कऱ्हाडे यांना 'दलित' म्हणजे एक वर्ग वाटतो आणि ते याच वर्गीय जाणीवेतून 'दलित' म्हणजे कोण हे सांगतात.

डॉ. भालचंद्र फडके हे दलित साहित्याचे अभ्यासक आहेत. त्यांना दलित शब्दाची व्याख्या अशी व्यापक किंवा वर्गीय जाणिवेतून करणे योग्य वाटत नाही. ते म्हणतात, "दलित शब्दाची व्याख्या सर्वसमावेशक करणे फारसे योग्य ठरणार नाही. कारण 'दलित' या शब्दामागे एक महत्त्वाची कल्पना आहे. हिंदू धर्माने आणि सामाजिक रूढीने ज्यांना आजवर बहिष्कृत मानले त्या माणसाला डॉ. बाबासाहेबांच्या मुक्तिसंग्रमात नवी शक्ती लाभली आणि त्याला आपले मूल्यवान अनुभव व्यक्त करण्याची संधी लाभली. हा दलित वर्ग भारताची पुराण, मूक आणि अदृश्य पुरूष होता."[६]

'दलित साहित्याचे निराळेपण' या ग्रंथात डॉ. प्रभाकर मांडे यांनी म्हटले आहे, "आपण येथे लक्षात घेतले पाहिजे की दलित हा शब्द या अर्थाचा वर्ग वाचक नाही, किंवा केवळ जातीवाचकही नाही. दलित म्हणजे एक विशिष्ट सामाजिक स्थिती अनुभवित असलेला समूह किंवा समाजगट. भारतातील समाजव्यवस्थेत या शब्दाला विशिष्ट अर्थ प्राप्त झाला आहे."[७]

डॉ. गो.म. कुलकर्णी यांच्या मते – "तळागाळात रूतून बसलेला सर्वच उपेक्षित समाज म्हणजे दलित समाज."[८] तर नामदेव ढसाळ म्हणतात, "दलित म्हणजे अनुसूचित जातीजमाती. बौद्ध, कष्टकरी जनता, कामगार, भूमिहीन शेतमजूर गरीब शेतकरी, भटक्या जमाती, आदिवासी इत्यादी. "[९]

दलित साहित्यात दलित माणसाच्या जीवनाचे चित्रण येते. परंतु नुसते दलित माणसाच्या जीवनाचे चित्रण साहित्यात आले किंवा दलितांनी लिहिले म्हणून त्याला दलित साहित्य म्हणता येईल का? कोणत्याही साहित्याचे वेगळेपण हे त्यातून व्यक्त होणाऱ्या जाणिवांच्या आधारे शोधता येते.

या संदर्भात डॉ. भालचंद्र फडके म्हणतात की, "दलितेतर लेखक आणि दलित लेखक यांच्या अनुभव घेण्याच्या शक्तीतच फरक आहे. दलितेतरांचा अनुभव संकल्पनात्मक आहे. तर दलित लेखकाचा अनुभव संवेदनात्मक असतो. एखादे नाटक वाचणे आणि तेच नाटक प्रयोगरूपात पाहणे यात फरक आहेच. तसे दलित लेखकाचे लेखन हा एक जिवंत अनुभव आहे. उलट दलितेवर लेखकाने जे लिहिले ते तितके उत्कट नसणे, जिवंत नसणे स्वाभाविकच आहे. म्हणून दलित साहित्यात आकारास येते, ते दलित लेकांचे जग. हे जग त्यांचे स्वतःचे असे आहे आणि ते त्यांनी भोगलेले आहे. त्या जगातच ते वाढले आहेत. दलित साहित्यातील दलितपणा अमुक एका जातीतील लेखकाने लिहिले यात नसतो किंवा समूहाचे जीवन निवडले यातही नसतो किंवा विशिष्ट 'पोझ' घेऊन लिहिले यात नसतो. तर तो दलितपणा माणसाच्या मुक्तीचा पुरस्कार करण्यात आहे, त्याला महान म्हणण्यात आहे. वंश वर्ग व जाती श्रेष्ठत्वाला कडाडून विरोध करण्यात आहे."[१०]

खरे तर दलित जाणीव म्हणजे दलित जीवनाच्या परिवर्तनाचा विचार होय. आशावादी दृष्टीकोन, दलित जीवनाची दुःखे तरलतेने टिपण्याची प्रवृत्ती तसेच सामाजिक बांधिलकीशी असणारे अतूट नाते म्हणजे दलित जाणीव. हिच दलित साहित्याचा मुलाधार आहे.

प्राचार्य म. भि. चिटणीस दलित लेखक आणि यशस्वी दलितेतर लेखक यांच्या लेखनातील

फरक व्यक्त करताना म्हणतात, "दलित वर्गाला आपल्या भावना, विचार यांचा अविष्कार स्वतंत्रपणे कधी करता आला नाही. याचे कारण धर्माने दिलेला दर्जा. माणसाचा धर्मप्राप्त दर्जा दलितांना विसरणे शक्यच नाही. अस्पृश्य हे अस्पृश्य आहेत. म्हणून धर्मप्राप्त दर्जा झिडकारून तो आपला आवाज आपल्या साहित्यातून प्रकट करीत आहेत. त्याचा आरसा स्वतंत्र आहे. तो ज्यात स्वतःला नीट न्याहाळू शकेल, असा हा दलित साहित्याने अस्मितेचा स्वतंत्र आरसा त्याला दिला. त्यामुळे दलित लेखन व यशस्वी दलितेतर लेखन यात फरक आहे."[११]

या संदर्भात शरदचंद्र मुक्तिबोध यांनी म्हटले आहे, "दलित असणे व दलित जाणीव असणे हे भिन्न आहे. दलित जाणिवेतून दलित जीवनविषयक जे वाङ्मय निर्माण होते ते दलित वाङ्मय."[१२]

दलित जाणिवेच्या संदर्भात बाबुराव बागुल असेही म्हणतात की, "नकार, विद्रोह, मानवमध्यमावतित्व, अनात्मवाद, अनेश्वरवाद, गतिवाद, ज्ञानविज्ञान आणि त्यांच्या योग्य उपयोगासाठी सत्ता, अर्थसत्ता दलितांच्या हातात असणे ही सम्यक क्रांतीची सूत्रे होत आणि हीच दलित जाणीव आहे."[१३] याचा अनुषंगाने आपले विचार मांडताना दया पवारांनी म्हटले आहे, "मध्यमवर्गीय समाजाने स्वीकारलेल्या जाणिवेला छेद देणारी, तळागाळातील माणसाबद्दल आपुलकी बाळगणारी वरील कप्पेबंद व्यवस्थेला नकार देऊ इच्छिणारी जी क्रांतीकारी जाणीव तीच दलित जाणीव."[१४]

दलित साहित्याच्या आविष्काराला जात अपेक्षित नाही तर अन्यायाविरूद्ध झुंज देणारी प्रवृत्ती महत्त्वाची असल्याचे सांगून प्रा. कुमुद पावडे म्हणतात, "माणूसकीच्या जगात माणसालाच प्रथम स्थान असावं. पक्षी, मुंग्या, प्राणी, मासे इ. करूणेचे विषय दलितांच्या नंतर असावेत. माणुसकीची जाणीव विसरलेला प्रेरणा बेगडी व हास्यास्पद असतात."[१५]

प्रा. योगेंद्र मेश्राम यांनी दलित जाणिवेसंबंधी म्हटले आहे, "दलित जाणीव म्हणजे दलित जीवनासंबंधीचा दृष्टिकोन एक धारणा."[१६]

याशिवाय दलित साहित्याच्या संदर्भात इतरही मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. त्यामध्ये डॉ. यशवंत मनोहर म्हणतात, "ज्या माणसांचे सर्वच बाजूंनी शोषण होते, तो माणूस अथवा समाज दलित होय." तर वि.स. जोग यांच्या मते, "हिंदू धर्मातील रूढींनी ज्यांना जन्मजात अस्पृश्यता दिली आहे, अशा अस्पृश्यांनी आपल्यावरील या जन्मनिष्ठ कनिष्ठावरील अन्यायाविरूद्ध आवाज ज्या साहित्यात उठवला आहे, ते म्हणजे दलित साहित्य."

प्रा. केशव मेश्राम म्हणतात की, "अस्पृश्य वर्गातील लेखकांनी निर्माण केलेल्या साहित्यास दलित साहित्य म्हणावे." ते पुढे आणखी असेही म्हणतात की, "दलित म्हणजे या युगाने ज्याचे हात प्रज्ञावंत प्रलंयकारी केलेले आहेत तो आणि ज्याच्यासाठी आधुनिक शस्त्रे आणि शास्त्रे उपलब्ध करून दिलेली आहेत तो या आपल्या दलितांच्या व्याख्येत अमेरिकेतील काळा, गोरा, तांबडा, आफ्रो आशियायी, शोषित, पिडीत, येतात." तर बाळकृष्ण कवठेकरांना असे म्हणावेसे वाटते की, "जन्मसिद्ध दलित लेखकांची विद्रोह व नकार यांनी युक्त अशा दलित संवेदनेची अभिव्यक्ती करणारे दलित जीवनानुभवाचे चित्रण करणारे साहित्य म्हणजे 'दलित साहित्य' होय." धनंजय कीर म्हणतात की, "दलित म्हणजे धर्माने आणि सामाजिक रूढीने ज्यांना आजवर बहिष्कृत मानले त्या लोकांचे साहित्य." राजा ढाले यांनी असे म्हटले आहे की, "हजारो वर्षे ज्यांच्यावर अन्याय झाला अशा अस्पृश्यांना दलित म्हटले पाहिजे व त्याच वर्गातील लेखकांनी निर्माण केलेल्या साहित्यास दलित साहित्य म्हणावे."

ताराचंद्र खांडेकर दलित साहित्याच्या संदर्भात म्हणतात की, "माणसाला ईश्वरनिष्ठा किंवा शोषणनिष्ठांनी बद्ध करण्यात येवू नये, त्यांचे स्वतंत्र अस्तित्व मान्य करावे, त्यांच्या सामाजिक अस्तित्वाची धारणा समता, स्वातंत्र्य, विश्वबंधुत्व या निष्ठांनी व्हावी हा विचार दलित साहित्याचा गाभा आहे." वामन इंगळे यांनी दलित साहित्याची व्याख्या करताना म्हटले आहे की, 'दलित' साहित्य ही संज्ञा मुलतः प्रश्नसूचक आहे. महार, मांग, चांभार, भंगी, खाटीक या आणि यासारख्या जातीच्या प्रश्नांचा विचार आणि ललित कृतीद्वारे आविष्कार करणाऱ्या साहित्याला दलित साहित्य असे म्हणता येईल. डॉ. अनिल अवचट यांनी परीट, न्हावी यांच्या बरोबरच गावगाडयाबाहेर वावरणाऱ्या भटक्या जमातीचा समावेश 'दलित' या शब्दात केला आहे.

वरील सर्व व्याख्यातून वर्णव्यवस्था, दारिद्र्या, पिळवणूक, संघर्ष, धर्म संस्कृती, मानवता, लढा, संघटना, आंबेडकरी विचार, जीवनमूल्ये, साहित्यमूल्ये अशा अनेक घटकांचा विचार होतो. या सर्व पार्श्वभूमीवर दलित साहित्याच्या प्रेरणा व स्वरूप महत्त्वाचे आहेत ते आपण पाहू.

१.अण्णाभाऊ साठे : दलित लेखकांचे पहिले संमेलन, उद्‌घाटनाचे भाषण, मुंबई १९५८.
२.तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : 'निकाय' नागपूर,ऑगस्ट-सप्टेंबर १९७६,पृष्ठ ५.
३.डॉ. म.ना. वानखेडे : अध्यक्षीय भाषण : स्मरणिका : दलित साहित्य संमेलन १९७६ पृष्ठ ६७.
४.बाबुराव बागुल : स्मरणिका : दलित साहित्य संमेलन, नागपूर १९७६ पृष्ठ २८० - २८१.
५.डॉ. सदा कऱ्हाडे : 'दलित साहित्याच्या निमित्ताने : मुंबई, सत्यकथा जुलै १९७० पृष्ठ २३.
६.डॉ. भालचंद्र फडके : दलित साहित्य म्हणजे काय? दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह, पृष्ठ २९-३०.
७.डॉ. प्रभाकर मांडे : दलित साहित्याचे निराळेपण, पृष्ठ २३.
८.डॉ. गो.म. कुलकर्णी : चिंतन दलित साहित्याचे : विशाखा दिवाळी अंक १९८४ पृष्ठ १३५.
९.नामदेव ढसाळ : आम्ही दिवाळी अंक १९७३, पृष्ठ ७७.
१०.डॉ. भालचंद्र फडके :दलित साहित्य म्हणजे काय? दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह, पृष्ठ २७.
११.प्राचार्य म.भि. चिटणीस : अस्मितादर्श, जाने-फेब्रुवारी १९७४.
१२.डॉ.शरदचंद्र मुक्तिबोध : मुलाखत : गो. म. कुलकर्णी समुचित ए.मे.जू. १९८५, पृष्ठ १०२ ते १११.
१३.बबुराव बागुल : उत्थान गुंफा : प्रस्तावना, पृष्ठ ७.
१४.दया पवार : मुलाखत गो.म. कुलकर्णी महाराष्ट्र साहित्य पत्रिका दिवाळी अंक १९८३, पृष्ठ १७५-१७६.
१५.कुमुद पावडे : अंतःस्फोट, पृष्ठ ४५.
१६.योंगेंद्र मेश्राम : साहित्य आणि सामाजिक बांधिलकी, दलित साहित्य जेव्हा चळवळ बनते. पृष्ठ १२.



*प्रा.चांगदेव कांबळे*
*कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय ,*
*पंढरपूर – जि.सोलापूर.*

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org